# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०६८ /२०१०

अर्जदार : श्री केशवराव नेमाजी परतवार,
राहणार १३, महावीर नगर,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
महाल विभाग,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपुर.

गणपुर्ती : १) श्रीमती के.के घरत,
सदस्य–सचिव

२) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या

–– अतंरिम आदेश ––

पारीत दि. ०६.१०.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक २७.०९.२०१० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ८.३ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराच्या गा–हाण्याचा तपशील :–

१. श्री. केशवराव नेमाजी परतवार, राहणार 13, महावीरनगर नागपूर, अर्जदार, यांना दिनांक २२.०९.२०१० रोजी गैरअर्जदारातर्फे विज पुरवठा खंडीत करण्याची नोटीस प्राप्त झाली होती. परंतु अर्जदाराची

विद्युत देयक दुरूस्ती करण्याची तक्रार गैरअर्जदारातर्फे निकाली काढण्यात आली नाही, विद्युत देयक दुरूस्त न करता गैरअर्जदारातर्फे विद्युत पुरवठा खंडीत करण्याबाबत नोटीस मिळाल्यावर अर्जदाराने विद्युत पुरवठा खंडीत न करण्याबाबत अंतरीम आदेश पारीत करण्याकरीता मंचाला विनंती केली आहे. सदर अर्ज दिनांक २७.०९. २०१० रोजी अर्जदाराने मंचात दाखल केला आहे.

२. दिनांक २९.०९.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री. श्रीवास्तव, उपकार्यकारी अभियंता, नदंनवन, उपविभाग, हे उपस्थित होते.

श्री केशवराव परतवार, अर्जदार यांनी आपली बाजु मांडतांना सांगितले की जुन २०१० पर्यंत त्यांनी आलेल्या विद्युत देयकाचा नियमित भरणा केला आहे. परंतु जुलै २०१० मध्ये आलेल्या इतक्या मोठया रकमेचे देयक त्यांना मान्य नाही. जर मीटर वाचनाचे विद्युत देयके त्यांना वेळेत मिळाले असते, तर त्यांनी नियमाप्रमाणे भरणा कला असता. परंतु गैरअर्जदाराने मीटरचे कोड संगणकामध्ये न भरल्याने त्यांना अचानकपणे रू. १,०९,५४५/— रक्कम असलेले विद्युत देयक मिळाले. गैरअर्जदाराच्या चुकीचा भुर्दंड त्यांना सोसावा लागत आहे, त्यामुळे विद्युत देयकात योग्य ती दुरूस्ती करण्यात यावी. तसेच नवीन मीटर त्यांना दोषयुक्त वाटत असल्याने मीटरची चाचणी करून देण्यात यावी. तसेच तक्रारीचे निराकरण होईस्तोवर विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस रद्द करण्यात यावी.

३. गैरअर्जदाराने आपले स्पष्टीकरण देतांना मान्य केले की १७ महिन्यापर्यंत सरासरी वापराचे विद्युत देयक अर्जदारास पाठविण्यात आले. परंतु मीटर वाचनानुसार जुलै २०१० मध्ये अर्जदाराला देण्यात आलेले विद्युत देयक बरोबर आहे.

सुनावणीच्या वेळेस मंचाने जेव्हा मीटर चाचणी विषयी विचारणा केली तेव्हा अर्जदाराने सांगितले की त्यांच्या मीटर चाचणी बाबत विनंती अर्जावर गैरअर्जदाराने कुठलीही दखल घेतली नाही.

४. मंचाने दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकले. तसेच मंचात सादर केलेल्या कागदपत्रांवरून असे स्पष्ट होते की अर्जदाराला एकाएकी १७ महीन्याचे मीटर वाचनाचे विद्युत देयक देण्यात आले आहे. तसेच अर्जदाराच्या मीटर चाचणी अर्जाची गैरअर्जदाराने दखल सुध्दा घेतली नाही व अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, नागपूर शहर मंडळ, येथे सदर प्रकरण प्रलंबीत आहे. तेव्हा विद्युत देयक दुरूस्तीचे प्रकरण निकाली न काढता गैरअर्जदारातर्फे थकबाकीपोटी विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस अर्जदाराला पाठविणे मंचाला न्यायोचित वाटत नाही.

तेव्हा गैरअर्जदाराला आदेश देण्यात येतो की त्यांनी सदर प्रकरण अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, नागपूर शहर मंडळ, येथे निकाली काढावे व त्यांच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी,

५. सदर प्रकरण अंतर्गत कक्षात प्रलंबित असल्याने, तसेच गैरअर्जदाराने केवळ वीज पुरवठा खंडीत करू नये हयासाठी तक्रार अर्ज केला आहे,

वरील सर्व बाबींचा विचार करून मंच अंतरिम आदेश देते की,

## आदेश

१. अर्जदाराचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस रद्द करण्यात येत आहे.

सही/–
(श्रीमती के.के. घरत)
सदस्य–सचिव

सही/–
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्या